# प्रभुतरुण


| वर्ष ५१ | अंक १० | मुंबई | मे, २०१८ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**



*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**


***संपादकीय***

## पदपुराण

**—सुहासिनी कीर्तिकर**

परवाच माझ्या एका पायानं मला ‘हात दाखवला’! चक्क संपावरच गेला की तो. मग मी त्याला जरा चुचकारलं. गोंजारलं. ‘बाबापुता’ करत त्याची मालीश करून दिली. पण तो कसला खट. नाही म्हणता नाहीच ऐकायला तयार. इतके लाड केले तरी अडूनच बसला. आता काय करायचं? गोळ्याबिळ्या घेऊन त्याला माझ्या शरीराच्या आतूनच रट्टा दिला चांगला. मग आला थोडा वळणावर. लाडीगोडी लावत, माझा ‘मूड’ अजमावत मला हळूच म्हणाला, ‘मी तरी काय करू गं? माझ्यावर तुझा भार तरी किती टाकतेस हल्ली. वजन आपलं तुझं वाढतच चाललंय. अन् मला दिवसभराची पळापळी तरी किती करायला लावतेस. इथं जा, तिथं जा. चित्रप्रदर्शनात, देशांतरात चाल चाल चालवतेस. उभ्या उभ्यानं भाषणंबिषणं देतेस अन् काय! मला आपलं माझ्याकडं अजिबात लक्ष न देता ताबडवतेस. मग म्हटलं जरा दाखवावा तुला माझा इंगा. कळलं? जे काही करतेस ते कर बापडी. पण माझा जरा विचार तर करत जा ना. लक्षात ठेव. मी आहे म्हणून तू उभी आहेस. मी तुझा जन्मापासूनचा सोबती आहे, सवंगडी आहे...’ असं म्हणत म्हणत त्यानं मस्त मजेत हिसका देऊन लाथ झाडली. खरं तर ती लाथ म्हणजे माझ्या मनावरचं विचारांचं ‘गोपद्म’च होतं.

कसले विचार? जन्मापासून सोबत करणाऱ्या, पायाच असणाऱ्या माझ्या पायांचे विचार. माणूस आपल्या जन्मदत्त अवयवांना किती सहज गृहित धरतो ना! जन्मदत्त अशी कितीतरी अवयवांची देणगी असते त्याला मिळालेली. मूळात मिळालेला, लाभलेला जन्म हीच मोठी देणगी असते. या देणगीचे नाना प्रकार नाना अवयवातून आपलं सगुण साकार रूप आनंददायी करत असतात. त्यातल्याच एका अवयवाच्या ‘पायाशी’ जायचं मनानं प्रसंगोपात्त ठरवलं आपलं. जन्मल्यावर असणारे तांबूस, कोवळे, इवलाले, लोभस पाय. वसंतात चैत्रपालवी फुटते झाडांना. तेव्हा त्या जून झाडांना फुटणारी इवली इवली पाने अशीच असतात. सकाळच्या कोवळ्या उन्हात पंजा धरल्यावर आपल्या बोटाबोटांतून ऊन झिरपत जाते तेव्हा दोन बोटांमध्येही असाच तांबूस प्रकाश मनभावन कोवळेपण दाखवत मऊमऊ होतो. ते मऊपण, तो तांबूस कोवळेपणा, ते चैतन्य बाळाच्या इवल्या इवल्या पायांमध्ये असतं. आपले (हात अन्) पाय सतत नाचवत बाळ नजरेला सुखच सुख देत असतं. ‘एक पाय नाचीव रे गोविंदा’ म्हणत त्या पायाशी सुखराशी ओतणाऱ्या कोवळ्या जीवांना आपण आंदुळतो. मग त्या पायांत वाढीची ताकद भरू लागते. बाळ कुशीवर वळतं, उपडं पडतं, आपल्या पायांच्या कौतुकानं स्वत:ला हळूच वर उचलत घोडाघोडा करतं, हळूहळू बसू लागतं. ‘ल’ आकाराची पायाची मांडी घालण्याचा आनंद घेता घेता कधीतरी धडपडत, उठत, पडत पायांवर उभं रहातं. ‘बाळ उभं राहिलं, कुणी नाही पाहिलं’... म्हणत मोठी माणसंही हा पायांच्या वाढीचा सोहळा उपभोगत रहातात. हे होतं न होतं तोच एक पाय सहज पुढे होतो. कुणाचं तरी आधाराचं बोट धरत, वस्तूंना पकडत मग दुसरा पाय टाकला जातो. डुगूडुगू, पुढंपुढं एकेक पाय टाकण्याची जादू बाळालाच काय; घरच्या सर्वांनाच अप्रूपाची होते. माणसाचे पाय असे हळूहळू ‘स्वत:च्या पायावर उभं’ रहायला शिकतात. इतर प्राण्यांचं तसं नसतं. जन्मलं की प्राण्याचं पिल्लू आपल्या चार पायांवर उभं रहातं. एक दोन दिवसात चालू लागतं. पण आपल्या पायांनी जन्मल्यापासून आपल्याला किती प्रयत्नपूर्वक साथ दिलेली असते ना! पाय प्रयत्नपूर्वक चालू लागले की कौतुकाचा घुंगुरवाळा घातला जातो. ‘हासत ये रे, नाचत ये रे, छकुल्या राजस बाळा’ म्हणत छुमछुमत्या, रुणझुणत्या पायांना ताल दिला जातो.

हा ताल पायांचा तोल सांभाळत पुढे धावता होतो, उड्या मारायला लागतो, एका पायानं लंगडी घालायला लागतो, तीन पायांची शर्यतही खेळायला लागतो. कधी मुरगळतो, लचकतो, ढोपरं फोडून घेतो; पण थांबत नाही कधीच. आजीवन हे पाय मग चालतच रहातात. धावतच रहातात. आयुष्याला साथ देत यशाचा पाया पक्का करत रहातात. अवघं जीवन व्यापून टाकतात. या पायांचे, या पायांच्या चालीचे प्रकार तरी किती! अनिल अवचट आपल्या विद्यार्थी दशेत निवांत वेळी म्हणे रस्त्यावरचा एक कोपरा धरीत अन् जाणाऱ्या येणाऱ्या पायांकडे पहात रहात. अंदाज बांधीत रहात. म्हणजे ‘हा दुडक्या दुडक्या चालीन चालतोय. आयुष्यात याला कशातच स्वस्थता नसणार. सदैव घाई.’ किंवा ‘हा पाय घासत घासत चालतोय. एका बाजूनं त्याची चप्पल झिजलीय. बिचारा कष्टानं दैवाधीन होऊन बापुडवाणा असणार.’ किंवा ‘एक पाऊल जरा डाव्या कोनात तर दुसरं पाऊल जरा उजव्या कोनात टाकतेय ही. बेरकीच असणार. दुसरं पाऊल टाकताना जरा हिंदकळतेयही. म्हंजे कुणाच्या तरी प्रेमाबिमात पडणार’... असले ‘टाईमपास’ अंदाज. अर्थात पायाच्या रेषांवरून, चालण्याच्या पद्धतीवरून माणसाचा स्वभाव कळतोच म्हणा! नाहीतर पूर्वी वधूपरीक्षा करताना तिला चालून दाखवायला कशाला बरं सांगत असतील? पायात काही व्यंग्य नाही ना; हा एक धोपट विचार त्यामागे. पण ती ‘वाकड्या चाली’ची नाही ना; हेही पारखणं असे म्हणे त्यात. माणसांना ओळखण्याच्या किती नाना तऱ्हा. त्यात पायही आलेच.

कारण संपूर्ण शरीरात जी जीवसंवेदना प्रवाही असते ती पायाकडे अधिक संवेदनशील होते म्हणतात. म्हणूनच आशीर्वाद घेण्यासाठी नत होऊन पायाला स्पर्श करतात. नम्र होण्यानं गर्व संपतो, समोरच्याविषयी आदर वाढतो आणि पदस्पर्शानं जीवसंवेदनेचे अलातचक्र नमस्कार करणाऱ्याच्या प्रवाहाशी जोडले जाऊन उर्जा प्राप्त होते. पायाला ठेच लागली की लगेच डोक्यात कळ जाते ती याच प्रवाहीत प्रभावाने. तुरुंगात देहदंडाची कारवाई करताना हातांची नव्हे; तर पायांचीच नखं उपटली जातात त्यामागे हेच कारण असावं. तिथं वेदना झाली की मेंदू बधिरतो, नकोनकोसं होतं जगणं. या उर्जेकारणानंच संपूर्ण देहशक्तीचं सगुण रूप म्हणजे पाय मानत असावेत. विठ्ठलाची समचरण असलेली मूर्ती पाहिली न् पाहिली तरी त्या चरणांवर समर्पण करणारी उत्कट भक्ती सगुणोपासनेचा कळसच असतो. ‘पहाता गुरुपाऊले, माझे भानही गळाले’ असे पंत महाराज अनुभवतात तेव्हा त्यांना ‘गुरूपाऊले’ म्हणजेच संपूर्ण सगुणरूप वाटते अन् भान गळून ते एकाकार होतात. सकाळी उठताना आपण धरणीला पाय लावताना ‘पादस्पर्शम् करिष्यामि’ म्हणत तिची क्षमा मागतो कारण गुरुपावलांमधलं गुरुत्व आपल्यासारख्या सामान्यांकडं नसतं म्हणून.

पण पाय तर लावावाच लागतो जमिनीला. या पायावरच तर जगण्याचा सगळा पाया. म्हणून मग जगताना पाय या शब्दाशी निगडीत वाक्प्रचार तरी किती! स्वाभिमानी माणूस ‘स्वत:च्या पायावर उभा’ असतो. ‘लाथ मारीन तिथे पाणी काढीन’ असा आत्मविश्वास त्याच्यात जागा असतो म्हणूनच तो उगाचच कुणाचे ‘पाय धरायला’ जात नाही. पण जेथे खरोखरच आदरणीय काही असते तेथे तो ‘पायांवर लोळण’ घ्यायला मागेपुढं पहात नाही. ही शरणोत्सुक वृत्ती त्याला

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)
जगण्याच्या पायावर घडवते. नपेक्षा दुसऱ्याला 'पायात पाय घालून पाडण्यात' काय हशील? मांजरीसारखा 'पायात, पायात घोटाळून' कसला आलाय आनंद? हां! पाय शब्दाला संस्कृतमध्ये 'पद' म्हणतात; त्याची बालीश आनंद देणारी काही भाषिक पोरकट गंमत इथे उगाच आठवून जातेय. कानडीत बालगीतात शब्द आहेत - 'मुदू मुदू मोदु पुटू पुटू पादू' म्हणजे लुटुलुटु चालणारे पाय (पादू) पाहून मोठा मोठा आनंद (मोदू) होतो असा त्याचा अर्थ. पण 'पुटु पुटु पादू' चा भलताच अर्थ त्या बालवयात लागायचा अन् मग काय?..... पादुच पादू! पुढं वयाची, प्रौढत्वाची 'पदोन्नती' झाली की हा बालीशपणा पायावरची सालटी निघावीत अन् पाय पुन्हा नीतळ व्हावेत त्याप्रमाणं गळून पडतोच. असो.

तर वाचकहो; हे असं 'पदपुराण' तुमच्या पायाशी!

*

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार दि. ३ जून २०१८ रोजी दुपारी ४ वाजता पाठारे प्रभु महिला सामाजातर्फे अधिकमासानिमित्त हळदीकुंकू समारंभ पाठारे प्रभु को. ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्र सभागृह, प्रभु नगर, १२ वा रस्ता, खार (प.) येथे साजरा करण्यात येईल. ज्ञातीय भगिनींनी जरूर उपस्थित राहावे. त्या दिवशी सभासद भगिनींसाठी संगीत व नृत्य स्पर्धा घेण्यात येतील.

१) संगीत स्पर्धा - १५ वर्षांवरील सभासद महिला
विषय - मराठी सिनेसंगीत
ब) १५ वर्षांखालील सभासदांच्या मुली
विषय - हिंदी सिनेसंगीत
२) नृत्यस्पर्धा - विषय - सिनेअभिनेत्री पद्मश्री श्रीदेवी यांनी हिंदी चित्रपटात केलेला नृत्याविष्कार
मुली - ५ ते ९ वर्षे, १० ते १५ वर्षे
मुले - ५ ते ९ वर्षे, १० ते १५ वर्षे
महिला - १६ ते २५ वर्षे, २६ ते ४० वर्षे, ४० वर्षावरील. रेकॉर्ड प्लेअरची व्यवस्था केली जाईल.

इच्छुकांनी त्वरित चिटणीसांकडे नावे नोंदवावीत.

* शनिवार दि. २० मे २०१८ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ दरम्यान पाठारे प्रभु महिला समाजातर्फे होतकरू उद्योजक/उद्योजिका बंधुभगिनींसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्वांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा. प्रवेश शुल्क रु. ५००/- नाव नोंदणीची अंतिम तारीख गुरुवार दि. १० मे २०१८. प्रीतीभोजन व चहाची व्यवस्था समाजातर्फे केली जाईल.

स्थळ : पाठारे प्रभु को ऑप. हौ. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राचे सभागृह, गायत्री मंदिराशेजारी, प्रभु नगर, १२ वा रस्ता, खार (प.) मुंबई.

विषय - मान्यवरांशी सल्लामसलत, चर्चासत्र, विविध प्रात्यक्षिके, अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे संपर्क साधावा.
चिटणीस - सौ. पल्लवी कोठारे
२६०४२६९८ / ९८६७६६४५८९
सं. चिटणीस : सौ. नूतन कीर्तिकर - २६०४९१५९/९६१९१६८१३१
सौ. रश्मा विजयकर - २२०१३८८३ / ९८२०९८१८८२

* शनिवार दि. १४ एप्रिल २०१८ रोजी ४.०० वाजता पाठारे प्रभु महिला समाजाचा चैत्रातील वासंतिक हळदीकुंकू समारंभ पाठारे प्रभु हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्र, खार (प.) येथे साजरा करण्यात आला. भगिनी बहुसंख्येने हजर होत्या. सर्व भगिनींचे स्वागत चिटणीस पल्लवी कोठारे व अध्यक्षा नीता सेंजित ह्यांनी केल्यानंतर फॅन्सी ड्रेस स्पर्धा, कलात्मक पाककृती स्पर्धा, रांगोळी व चित्रकला स्पर्धा, मराठी व हिंदी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. रांगोळी, चित्रकला स्पर्धांचे परीक्षण वंदना नवलकर व स्वाती जयकर यांनी केले. कलात्मक पाककृती स्पर्धेचे परीक्षण प्रमिला तळपदे व वंदना नवलकर यांनी केले तर; फॅन्सी ड्रेस स्पर्धा मराठी व हिंदी वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण वृंदा जयकर व वंदना नवलकर यांनी केले.

सर्व उपस्थित भगिनींना समाजातर्फे हळदीकुंकू, बत्तासे, चणे, गजरे व पन्हे देण्यात आले. बिंबा व गौरी नायक आणि विभा रणजित यांनी स्वादिष्ट आंबाडाळ व सुमधुर थंडगार पन्हे यांची व्यवस्था पाहिली. छाया विजयकरांकडचे गजरे होते. देवीची आरास व इतर नेमून दिलेली कामे संयुक्त चिटणीस नूतन कीर्तिकर, रश्मा विजयकर आणि कार्यकारी समितीने व्यवस्थित पार पाडली.

स्पर्धेत यशस्वी झालेल्या स्पर्धकांना विश्वस्त वंदना नवलकर, वृंदा जयकर, स्वाती जयकर यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. त्या दिवशी आलेल्या देणग्या, तहहयात सभासदांची नावे पल्लवी कोठारे यांनी जाहीर केली. सर्व उपस्थित भगिनींनी देवीची आरती केल्यानंतर कार्यक्रम संपन्न झाला.

त्या दिवशी पाठारे प्रभु महिला सामाजाच्या उद्योग केंद्रातर्फे त्यांनी चालविलेल्या शिवण क्लासमधील महिलांनी शिवलेल्या कापडांच्या विविध पिशव्यांची विक्रमी विक्री झाली. त्यासाठी सौ. शेफाली विजयकर यांचे बहुमोल सहाय्य झाले. प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीमुळे ह्या पिशव्यांना भगिनींनी पसंती दिली.

त्या दिवशी झालेल्या स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे-
१) फॅन्सी ड्रेस स्पर्धा - अ - गट, १५ वर्षांखालील मुली. कु. कायशा सत्यजित नायक ही एकमेव स्पर्धक असल्यामुळे तिला समाजाचे बक्षिस देण्यात आले.
ब - गट १५ वर्षांवरील भगिनी
प्रथम क्रमांक - सौ. स्वप्ना विनित जयकर
द्वितीय क्रमांक - श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर
तृतीय क्रमांक - सौ. मीना धराधर आंबवणे
२) वक्तृत्व स्पर्धा - मराठी - १५ वर्षांखालील मुली
विषय - मला कोण व्हावेसे वाटते? मराठी माय ॲम्बीशन - इंग्लिश
या गटात कु. मोहना मनिष कोठारे ही एकच स्पर्धक असल्यामुळे तिला समाजाचे बक्षिस देण्यात आले.
ब - १५ वर्षांवरील महिलांसाठी
विषय - आजची स्त्री सुरक्षित आहे का?
प्रथम क्रमांक - सौ. मीना धराधर आंबवणे
द्वितीय क्रमांक - सौ. स्वप्ना विनित जयकर
तृतीय क्रमांक - श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर
उत्तेजनार्थ - सौ. पवित्रा प्रदीप कीर्तिकर
३) वक्तृत्व स्पर्धा - हिंदी - १५ वर्षांवरील महिला
विषय - स्वच्छ भारत अभियान।
प्रथम क्रमांक - सौ. स्वप्ना विनित जयकर
द्वितीय क्रमांक - श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर
४) कलात्मक पाककृती स्पर्धा
विषय - भाज्यांपासून बनविलेली आकर्षक
(पान ५ कॉलम ३ वर)

**उद्यम्**

### कमी भांडवलात सुरू करा...

## पेपर बॅग मेकिंग व्यवसाय

**-सुदेश प्रबोध देसाई**

प्लॅस्टिक पिशव्या वापरण्यासाठी बंदी आल्यामुळे कागदी पिशव्याचा व्यवसाय करणाऱ्यांसाठी उत्तम संधी निर्माण झाली आहे.ह्या संधीचा जो फायदा घेईल तो करोडो रूपयाची उलाढाल करू शकेल. ह्या पिशव्यांचा वेगवेगळ्या वस्तूंसाठी वापर होऊ शकतो. उदा. ज्वेलरी ठेवण्यासाठी डिझाईनर पिशव्या, रेडिमेड गारमेंट दुकानासाठी, मॉलमध्ये, गिफ्ट आर्टिकल्स विक्री दुकानात, टिफिनचे डबे नेण्यासाठी व इतर.

हा व्यवसाय करण्यासाठी वेगवेगळ्या साईजमध्ये, वेगवेगळ्या डिझाईनमध्ये, वेगवेगळ्या पेपरमध्ये डाय करून (Forma) ठेवाव्यात. आपल्याला पेपर बॅगस् बनवण्यासाठी वेगवेगळ्या गेजमध्ये पेपर मिळतात. त्यात हँडमेड पेपर, ब्राऊन पेपर, डिझाईन केलेला पेपर इत्यादी. हे पेपर आपल्याला मार्केटमध्ये होलसेल रेटमध्ये मिळतात. काही पेपर आपल्याला किलोमध्ये किंवा काही पेपर डझनामध्ये मिळतात.

**पेपर बॅगस् बनवण्यासाठी साहित्यः** गम, मोजपट्टी, आयलिडस्, दोरी, पंच

हा व्यवसाय आपण कमीत कमी इन्व्हेस्टमेंटमध्ये घरच्या घरी करू शकतो व आपण पेपर बॅग हातानेसुद्धा करू शकतो. तसेच मोठ्या प्रमाणात करायचे असेल तर मशिनद्वारे करू शकता. बॅगचा प्रोजेक्ट करताना पंचिग मशिन व कटिंग मशीन लागते. ती सध्या इन्व्हेस्टमेंट न करता आपण ते काम आऊटसोर्स केले तर कमी भांडवलामध्ये हा व्यवसाय सुरू करू शकतो.

जर आपण १००० बॅग दिवसाला बनवल्या तर आपल्याला एक बॅग बनवण्यामागे रु. १२.५० खर्च येतो. हीच बॅग रिटेलमध्ये रु. ४०ला मिळते.

जर आपण प्रत्येक बॅगमागे रु. ५ फायदा ठेवला तर रु. ५,००० दिवसाला नफा मिळवू शकतो.

तसेच २५ दिवस काम केले तर रु. १,२५,००० फायदा होईल.

तसेच १२ महिने काम केले तर १५ लाख रुपयांचा वार्षिक फायदा होईल. हा फायदा कमी वाटत असेल तर, दिवसाला ५,००० बॅग बनविल्या तर रु. ५ प्रति बॅग फायदा ठेवला तर आपल्याला रु. २५,००० चा फायदा होऊ शकतो.

मग महिन्याला रु. ६,२५,००० फायदा व वर्षाला रु. ७५,००,००० फायदा होईल.

**थोडक्यात मार्केटिंग कसे करावे?**

ह्या बॅगेची कामे आपल्याला रेडिमेड गारमेंट शोरूम उदा. कॉटनकिंग, पानेरी, क्रेब्रिज अशी असंख्य दुकाने तसेच हॉटेलमध्ये होम डिलेव्हरीसाठी, हॉस्पिटलमध्ये रिपोर्ट पेपर बॅगमधून देतात, ज्वेलरीची दुकाने त्यांच्या बँडच्या कागदी पिशव्या बनवून घेऊन त्यात दागिने देण्यासाठी वापरतील.

तसेच प्रत्येक मार्केटमध्ये पिशव्या विकणारे विक्रेते आपल्याकडून पिशव्या विकत घेऊन इतरांना विकतील. तसेच ह्या पिशव्या एक्सपोर्ट होतील व ऑनलाईन सेलसुद्धा करता येतील. जर आपण नीट लक्ष दिले तर ह्याचे मार्केट जबरदस्त होऊ शकते.

**अधिक माहितीसाठी संपर्कः**
सुदेश प्रबोध देसाई।
९२२३३५७२०७
sudesh69desai@gmail.com

*

कथाकली

# पार्टी

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

''काल अवंतीच्या बर्थ डे पार्टीला खूप मजा आली नाही?'' - आशानं सुचित्राला विचारलं...

''हो गं! पार्टी तर छानच अॅरेंज केली होती. अवंतीचा नवा पाचूचा सेट बघितलास? खूपच छान होता' - सुचित्रा उत्तरली.

'तरी पण ते डिझाईन खूप जुनं आहे गं. अवंतीनं एवढा नवा सेट केला तर डिझाईन तरी फॅशनचं घ्यायचं नं!'' - मंजिरी म्हणाली.

''त्या सुनावालाची गढवाल बघितलीस? पाच हजाराची होती.'' त्यावरून आठवलं... ती सुनीता आपटे - म्हणजे ते नवीन जज्ज आलेयत ना मुंबईला ट्रान्सफर होऊन, ती जिला तिला स्वत:ची पैठणी दाखवीत होती. म्हणत होती की पंचवीस हजारांची आहे.''

''एऽऽ, तिला एवढी महाग पैठणी परवडते कशी?''

''छे गं! पंचवीस हजारांची कुठली? मला विचार पैठणींच्या किंमती. अगं माझी एक मैत्रीण नेहमी पैठणीचं प्रदर्शन भरवत असते. तिच्याबरोबर राहून मलासुद्धा बरंच कळतं ह्या पैठणीतलं. फक्त चार हजारांची होती. मला तर तिची दयाच आली. पहिल्यांदा गप्प गप्पच होती. पण पोलीस कमिशनर जाधवांची बायको आहे नं, तिनं तिला सांगितलं म्हणे की इथं एकदम हायफाय बायकाच असतात आणि सगळ्याच उगीचच किंमती वाढवून सांगत असतात.'' ज्योतीनं सांगितलं.

''असं सांगितलं त्या जाधविणीनं?'' - मंजिरीनं रागानं विचारलं.

''मंजिरी, ''जाधवीण'' काय म्हणतेस? नीता जधव म्हणत की!'' - सुरेखानं नापसंती दर्शविली.

''अगं असं नीट जाधव म्हटल्यानं तिच्या व्यक्तिमत्त्वात किंवा मूर्खपणात फरक पडतो का? - मंजिरी फणकारली.

''तिला ना, लाज वाटली संगळ्यांच्या साड्या नी दागिने बघून! त्या बायकांना तर कुठे काय नेसायचं हे कळतच नाही. बर्थ डे पार्टीला कोण पैठणी नेसतं?''

''नसेल गं तिच्याकडे सिल्कमधली दुसरी भारी किंमतीची साडी. त्या प्रियासारख्या नोकरी करणाऱ्या बायकांना अशा पार्ट्यांची कल्पनाही नसेल; नाही?''

''मंजिरी, तुझ्या डोक्यातून 'प्रिया' जातच नाही का गं?''

''अगं, ह्या सगळ्याच प्रियाला ओळखतात म्हणून नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गीय बायकांची प्रतिनिधी म्हणून मी तिचं नाव घेतलं. मला एवढंच म्हणायचंय की, संसार चालवण्यासाठी अशा बायकांना नोकरी करावीच लागते. आपल्यासारखं नाही त्यांचं.'' मंजिरी उपहासानं म्हणाली.

''आपल्याबद्दल ह्या बायका म्हणतात की ह्या श्रीमंतांच्या बायका नुसत्या नवऱ्याच्या पैशांवर मजा मारतात, नवऱ्याचा पैसा उधळतात नी संपवतात.''

त्यांना मिळत नाही नं तसं! म्हणून जळफळतात. खरं तर त्या बायका घर चालवतात नी त्यांचे नवरे बायकांच्या जीवावर जगतात आणि प्रपंच ढकलतात.''

''खरंय ग बाई! त्यांना तर आपल्यासारखं साडीला मॅचिंग पर्स, कॉसच्युम ज्युवेलरी किंवा खरे दागिने, चपला, टिकल्या, आय शॅडो काहीच कळत तर नसणारच; पण माहीतही नसणार...''

''मला तर बाई प्रत्येक साडीवर मॅचिंग अशा खऱ्या दागिन्यांचा सेटच लागतो. तेच तेच दागिने कोण घालणार?'' - मंजिरी आढ्यतेनं म्हणाली.

हे वाक्य ऐकताच सुरेखा आणि अंजलीची नजरानजर झाली. पण दोघीही गप्प बसल्या.

आशा मंजिरीची री ओढत होती - ''अगं, पूर्ण भिंतभर माझा वॉर्डरोब आहे आणि त्यात खाली मॅचिंग पर्स नी चपलांच्या रॅक्स आहेत.''

''मी तर बाई कधी कधी एका साडीवर दोन तीन पर्सेस आणि तेवढेच चपलांचे जोड, केसांच्या पिना आणि दहा दहा पाकिटं टिकल्या घेते'' - मंजिरीचं 'अहं' पुराण चालूच होतं.

''मंजिरी तू परफ्यूम कोणते वापरतेस?''

''चार्ली, ब्रूट, जोवान मस्क, ड्रॅकानुआर....''

''काय हे मंजिरी, अगं पुरुषांनी वापरायचे परफ्युमस् तू काय वापरतेस?'' - सुचित्रानं विचारलं.

''त्यात काय झालं? हे आणतात त्यातलं आवडेल ते वापरते. आणि हा फरक किती जणींना माहीत असतो?''

''अगं, मागच्या आठवड्यात झुनझुनवालांकडच्या पार्टीत रंगबाधनची बायको मला सांगत होती की तुमच्या मैत्रिणीला मंजिरीला सांगा की बायकांनी वापरायचे परफ्युमस् कोणते ते..''

''काय बाई अगोचरपणा तिचा! थांबा! पुढच्या पार्टीत तिच्या पेहरावातले दोषच दाखवते. तिची हिऱ्याची कुडीच लखलखत असतात आणि चक्क हिरव्या साडीवर लाल ब्लाऊज घालते... ए अंजली, आज तू गप्प गप्प का?''

''काही नाही गं. एकतेय तुमच्या गप्पा.''

'' तू पण भाग घे नं गप्पांमध्ये. तुला बरं नाहीय का?''

''नाही गं. काल अभिजीतबरोबर रात्री केबलवर सिनेमा बघत होते.

''होम थिएटरवर बघायला मजा येते. त्यामुळे रात्री उशीरा झोपते.''

''त्यात काय? सकाळी तर उशीराच उठतेस नं?''

''नाही गं आता अभिजीत सकाळी ऑफीसमध्ये लवकर जातो नं! म्हणून मी लवकर उठते.''

''उठायलाच हवं. पूर्वी आमच्या कंपनीत होता तेव्हा उशीरा काय यायचा, दांड्या काय मारायचा! आता वशिल्यानं मिळालेली ही नोकरी टिकवायलाच हवी त्याला...''

अंजली, सुचित्रा, सुरेखा हे बोलणं ऐकून मंजिरीला कंटाळल्या होत्या. म्हणून ज्योतीनं वेगळाच विषय काढला - ''अगं त्या पटवर्धनांच्या मुलीचा घटस्फोट झाला म्हणे.''

''हो. कुणी म्हणतात तिची दुसरी भानगड आहे तर कुणी म्हणतात नवराच वाईट आहे.

''अगं ह्या मुलींचे पालक जावयाला खूप काही देतात. मग जावयाच्या अपेक्षा वाढतात आणि मग होतं असं. खरं तर अशा बाबतीत कोणाबरोबर ती कोण चूक कळतच नाही.''

''आपल्याला काय करायचंय? आपल्याला फक्त त्या बातमीशी मतलब असतो. एऽऽ त्या जोशींचा नातू बघितलात? कुणासारखाच दिसत नाही. ती जोशींची मुलगीच वाईट चारित्र्याची आहे.''

''मंजिरी, आतां तरी अशी दुसऱ्यांवर सतत चिखलफेक करणं बंद कर. अं.. आपण सगळ्याच ह्या आपल्या भिशी ग्रुपचं रूप जरा बदलू या का? माझ्या दुसऱ्या भिशी ग्रुपसारखं करुया?

''अंजली, प्लीज, तुझ्या त्या मध्यमवर्गीय ग्रुपची अवकळा ह्या ग्रुपला आणायचा प्रयत्न करू नकोस.''

''ती काही अवकळा नाही. अगं, दुसऱ्याचं जे जे चांगलं आहे ते ते आपल्या स्वभावात, वृत्तीत, कृतीत आणण्याचा जरूर प्रयत्न करावा. अशा प्रकारची नक्कल नक्कीच स्वागतार्ह ठरते. आपल्या ह्या ग्रुपची तत्त्वं चुकीची आहेत. आपण फक्त नवऱ्याचा पैसा उडवणाऱ्या श्रीमंत बायका... आपण ना श्रमांची किंमत जाणत ना पैशाचं महत्त्व. ह्या आपल्या चुकीच्या वाटचालीमुळे माझं माझ्या मुलाकडे लक्ष राहिलं नाही आणि त्याच्यात नी माझ्यात दरी निर्माण झाली. ही माझी चूक असेलही पण चिन्मय लेलेचं आयुष्य आपणच पणाला लावलं. असे पुष्कळ चिन्मय लेले आणि मेघना काळे आपल्या ह्या पार्टीत विनाकारण बदनाम झालेयत. काहींची तर आयुष्यंच बरबाद झाली. हा वेळ आपण जर विधायक कार्यात घालवला ना घरासाठी. मंजिरी, तुझी मानसी कायम वेगवेगळ्या मुलांबरोबर दिसते. मुलांचे मजा करण्याचे, हसण्या खेळण्याचे हेच दिवस असतात असं तू नेहमी म्हणतेस ते खरं असलं तरी निसर्ग मुला-मुलींची मध्यमवर्गीय पार्श्वभूमी किंवा श्रीमंत स्थिरता बघत नाही. देव सजा ह्या दोन्ही वर्गांना सारखीच देतो. फक्त श्रीमंत लोक पैशांनी सगळं काही सुख, शांती, समृद्धी नी प्रतिष्ठा सारं सारं विकत घेऊ शकतात, विकत घेऊ पाहतात. पण मध्यमवर्गीय लोक असं

(पान ५ कॉलम ४ वर)

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



संवाद

# गुलामाचा व्यापार

-विश्वास अजिंक्य

गुलामगिरीची प्रथा इतिहासात जगभर आढळून येते. एका मनुष्याला दुसऱ्या मनुष्यावर माल-मत्तेप्रमाणे अधिकार गाजविण्यास समाजाने मान्यता देणाऱ्या पद्धतीला ''गुलामगिरी'' म्हणतात. पूर्वी गुलाम बनविण्याचा प्रसंग युद्धामुळे उत्पन्न होत असे. युद्धात कैद केलेल्या लोकांना गुलाम बनविले जाई. त्याचबरोबर कर्जबाजारी, तसेच गुन्हेगार व्यक्तीसदेखील गुलाम बनविले जाई. आजही कर्जबाजारी लोकांना गुलाम म्हणून सावकाराच्या ताब्यात देण्याची पद्धत काही ठिकाणी अवलंबली जाते. स्वत:च्या मुलांना गुलाम म्हणून विकण्याची चालदेखील प्राचीन समाजात होती. दारिद्र्यामुळेदेखील एकाच समाजातील व्यक्ती एकमेकांचे गुलाम बनत असत. त्याकाळात शेतीचे व गुरे सांभाळायचे काम पुरुष गुलामांकडून व घरकाम स्त्री गुलामांकडून करून घेत असत. युद्धातील कैद्याला गुलाम बनविले असल्यास मालकाशिवाय इतर कोणालाही त्यास ठार मारण्याचा अधिकार नसे. उलट इतरांनी गुलामास ठार मारल्यास मालकाला नुकसान भरपाई मागता येत असे. गुलाम स्त्रीला यजमानापासून मूल झाल्याबरोबर ती व मूल स्वतंत्र म्हणून गणली जात असे. मुस्लिम राज्यकर्ते असलेल्या देशात एखाद्या गुलामाने इस्लाम धर्म स्वीकारला तर त्याला गुलामगिरीतून मुक्त करण्याची तरतूद होती. तर एखादा गुलाम स्वकर्तृत्वाने वर चढत चढत राज्यकर्ता झाल्याची उदाहरणे देखील सापडतात. महंमद घोरीने दिल्ली काबीज केल्यावर आपला गुलाम कुतुब्बुद्दीन ऐबकवर दिल्लीची जबाबदारी सोपवली व तो परत निघून गेला. महंमद घोरीच्या मृत्यूनंतर कुतुब्बुद्दीन ऐबकने स्वत:ला दिल्लीचा सुलतान घोषित केले. घोरी साम्राज्यामध्ये त्याच्या कित्येक तुर्क गुलामांनी स्वत:ची कर्तबगारी सिध्द केली होती व उच्च पदाला पोहोचले होते. तर महाराष्ट्रात इ. स. १६०५ ते १६२६ ह्या काळात मलिक अंबर निजामशाहीची सूत्रे हातात घेऊन होता. एक हबशी गुलाम ते अहमदनगरच्या निजामाचा वजीर हा त्याचा प्रवास थक्क करणारा आहे. या काळात त्याने मोगलांना सळो की पळो करून सोडले होते. १६व्या शतकात बगदाद आणि येमेन येथून आफ्रिकेतल्या गरीब मुलांना व तरुणांना गुलाम बनवून दक्षिण भारतातील राज्यांमध्ये योद्धे म्हणून पुरवण्याचा व्यवसाय तेजीत होता. या काळात आफ्रिकेतून हबशी लोकांना भारतीय सरदार गुलाम म्हणून विकत घेत. या सरदार मालकांचा मृत्यू झाल्यावर हे हबशी गुलामगिरीतून मुक्त होत. त्या काळात समुद्रावरून किनाऱ्यावर उतरून लोकांना पकडून पळवून नेणे व परराज्यात नेऊन विकणे हा भयंकर धंदा चाचे मोठ्या प्रमाणावर करीत असत. अशा लोकांच्या तावडीत सापडून कोण केव्हा गुलामगिरीत पडेल याचा नेम नसे.

युद्धात जिंकल्या गेलेल्यांना गुलाम करायचे प्रकार तर सर्रास रूढ होते. गुलामांची खरेदी-विक्री व्हायची. त्यांचे बाजार भरायचे. त्यांना त्यांच्या इच्छेविरूध्द विकत घेण्यात येत असे किंवा ते जन्मापासूनच गुलाम समजले जात असत. गुलाम ही मालकाची मालमत्ता समजली जात असे. मुसलमानांमध्ये तर गुलामांच्या संख्येवर मालकाची श्रीमंती मोजली जायची. गुलामांना बळाचा किंवा धाकाचा वापर करून काम करायला लावले जात असे. काम सोडून जाण्याचा; कामास नकार देण्याचा; किंवा कामासाठी मोबदला मागण्याचा अधिकार त्यांना नव्हता. काही जुन्या गुलामगिरीच्या व्यवस्थांमध्ये तर मालक गुलामांना ठारही मारू शकत. इ. स. १४४१ साली पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी काही आफ्रिकी गुलाम पोर्तुगालला आणले. परंतु गुलामांच्या व्यापाराला तेजी आली ती १६व्या शतकाच्या सुरवातीपासून. आफ्रिकेतील मागासलेपणाचा फायदा घेऊन पाश्चिमात्त्य लोकांनी निग्रो जमातीत आपापसात भांडणे लावली. त्यामुळे स्थानिक टोळ्यांचे म्होरके, राजे आपापसात लढत व युद्धकैदी गुलाम म्हणून आणत. पुढे हे युद्धकैदी गोऱ्यांना विकले जाऊ लागले. पुढेपुढे तर गोऱ्यांना विकायला कैदी हवेत म्हणून युद्धे होऊ लागली. पश्चिम आफ्रिकेतील दाहोमीचा राजा तर दरवर्षी आपले सैन्य गुलाम पकडण्यासाठी शेजारच्या राज्यात पाठवीत असे. युरोपियन व्यापाऱ्यांनी आणलेल्या आकर्षक वस्तूंच्या अभिलाषेने अनेक आफ्रिकी टोळ्यांचे नेते आपल्याच बांधवांना गुलाम म्हणून विकत. हे निग्रो पुढारी व गुलाम गोळा करणाऱ्या व्यापाऱ्यांचे हस्तक रात्रीच्या वेळी निग्रो लोकांच्या वस्तीवर अचानक हल्ला करून आगी लावून देत. त्यातून जीव वाचविण्यासाठी पळणाऱ्या निरपराध निग्रोंची धरपकड करून त्यांना परदेशी पाठवण्यात येत असे. निग्रोंची धरपकड करताना होणाऱ्या झटापटीत काही निग्रो मरत. या पकडलेल्या लोकांना बळजबरीने गुलाम बनविले जाई व त्यांच्याकडून कष्टाची कामे करण्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या युरोपियन वसाहतीत विकण्यात येत असे. गुलामांची किंमत म्हणून निग्रो जमातीचे म्होरके व पुढारी लोकांना कपडे, रम, दारूगोळा, काचेचे खडे, कट ग्लासेस इत्यादी वस्तू दिल्या जात.

नवीन वसाहतींमध्ये कापसाचे व उसाचे मोठमोठे मळे उभे राहिले. त्यासाठी मनुष्यबळ लागायला लागले. संपत्तीची निर्मिती शेतीतून होते; अशी युरोपियन लोकांची धारणा होती. त्यामुळे गुलामाला जमिनीवर राबवून अधिकाधिक काम करून घेणे असा त्यांचा खाक्या होता. स्पॅनिश लोकांनी अमेरिकेत वसाहती करताना उसाच्या मळ्यामध्ये आणि साखर कारखान्यात काम करण्यासाठी सुरुवातीला हजारो स्थानिक लोकांना गुलाम बनवून, वेठबिगार म्हणून कामाला जुंपले होते. त्यांना धाक दाखवून, अनन्वित छळ करून राबवून घेण्यात येत असे. त्यातील बरेच अतिश्रमामुळे मेले. काही रोगांना बळी पडले; तर कित्येक पळून गेले. म्हणून एका कॅथलिक धर्मगुरूनेच स्पेनच्या राजाकडे मागणी केली की; अमेरिकेतील स्थानिक लोकांऐवजी आफ्रिकेतील गुलामांना या कामाला जुंपावे. राजाच्या हुकूमावरून १५०० निग्रो गुलामांची पहिली तुकडी दक्षिण अमेरिकेतील उसाच्या मळ्यांवर आणि साखर कारखान्यात पाठवण्यात आली.

हे निग्रो सगळे धट्टे-कट्टे आणि काटक. त्यात एक निग्रो चार स्थानिक माणसांइतके काम करीत असे. त्यामुळे त्यानंतर आफ्रिकेत पकडून आणलेल्या गुलामांची मागणी वाढून त्यांचा ओघ अमेरिकेतल्या ऊस मळ्यांवर सुरू झाला आणि आफ्रिकेतून गुलाम आणायचा व्यापार फोफावला. आधुनिक कालखंडात स्वत:ला सुसंस्कृत समजणाऱ्या युरोपियन लोकांनी आफ्रिका खंडातील लाखो-करोडो निग्रोंना श्वापदांप्रमाणे पकडून त्यांचा अमेरिकेत व्यापार केला. जवळपास दोनशे वर्षे आफ्रिका आणि अमेरिका यांच्यामध्ये गुलामांचा व्यापार पद्धतशीर चालू होता. सतराव्या शतकात इंग्लंडनेही हा व्यापार सुरू केला. अरब व्यापारी तर शतकानुशतके आफ्रिकेतून गुलाम पळवून नेत व त्यांची मोठ्या प्रमाणावर पश्चिम आशियातील देशात विक्री करत.

पायात बेड्या घातलेल्या गुलामांना गळ्यातल्या साखळीने एकमेकांना जोडून त्यांच्या टोळ्या जहाजावर चढवल्या जायच्या. जेवढे जास्त गुलाम कोंबाल तेवढा जास्त नफा. या हिशोबाने कमीतकमी जागेत जास्तीतजास्त गुलामांना डांबले जायचे. मलमूत्र विसर्जनाचीही सोय नसायची. उलट्या, हगवण व अन्य रोगांमुळे ३० टक्के गुलाम अमेरिकेच्या किनाऱ्यापर्यंत पोहचेपर्यंत मरून जायचे. त्यांचे मृतदेह समुद्रात फेकून देण्यात येत असत. अमेरिकेत पोहोचल्यावर हे गुलाम बाजारात विकावयास बहुतेक नग्न स्थितीतच आणले जात. खरेदी करताना घोड्याप्रमाणे त्यांच्या तोंडातील दात व सांधे तपासून पहात असत. प्रत्येक गुलामाला सुमारे २० पौंड किंमत येत असे.

त्यावेळी अमेरिकेत गुलामगिरीची पद्धत खूप होती व गोरे लोक गुलामांची एकमेकात विक्रीदेखील करीत असत. निग्रो गुलामांना त्यांचे गोरे मालक फारच निर्दयपणे वागवीत असत. एखाद्याला गुलामगिरीतून बाहेर पडायचे असेल तर त्याला मोठी रक्कम गोऱ्या मालकाला द्यायला लागायची. कॅलिफोर्नियात १८४८ मध्ये सोन्यासाठी जी झुंबड उडाली होती; त्यावेळी काही गोऱ्या लोकांनी त्यांच्या निग्रो गुलामांना सोने मिळवण्यासाठी सोबत आणले होते. सोने मिळविण्याचे काम खूप कष्टाचे होते. पण हे निग्रो लोक धट्टेकट्टे असल्यामुळे ते हे काम इतरांच्या तुलनेत सहज करायचे. यापैकी काही गुलामांनी खूप कष्ट करून एवढे पैसे मिळविले की आपल्या गोऱ्या मालकांना पैसे देऊन ते गुलामगिरीतून मुक्त झाले. काहींनी स्वत:लाच नाही तर त्यांच्या कुटुंबातील इतर लोकांनाही अशाच प्रकारे गुलामगिरीतून मुक्त केले.

कालांतराने पुढे गुलामांच्या व्यापारामागील अमानुषता, निर्दयीपणा व त्यांच्यावर होत असलेले अन्याय, अत्याचार याची माहिती युरोपातील सामान्य जनतेला कळू लागली. तेव्हा साहजिकच निग्रो गुलामांबद्दल सहानुभूती निर्माण होऊन त्यांच्या मुक्ततेसाठी मोठ्या प्रमाणावर चळवळी झाल्या. गुलाम पद्धतीचे भयंकर स्वरूप लक्षात येताच लोकांचे मत या व्यापाराविरुद्ध बनले. गुलामगिरीची प्रथा संपूर्णपणे बंद होण्यासाठी गुलामांचा आंतरराष्ट्रीय व्यापार बंद होणे आवश्यक होते. परंतु हा व्यापार अत्यंत किफायतशीर असल्यामुळे तो सोडून देण्यास कोणताही देश तयार नव्हता. अमेरिकन स्वातंत्र्य युद्धानंतर गुलामगिरी विरूद्ध सुरू असलेल्या चळवळीस जोराची चालना मिळाली. तथापि जॉर्जिया आणि दक्षिण कॅरोलायना संस्थानांच्या विरोधामुळे तेथे गुलाम प्रतिबंधक कायदा होऊ शकला नाही. उत्तर व दक्षिणेकडील संस्थानांच्या मतभेदाची परिणती अध्यक्ष अब्राहम लिंकन ह्यांच्या कारकिर्दीतील यादवी युध्दात झाली.

(पान ६ कॉलम २ वर)

काही अद्‌भूत अनुभव

# पाठीराखा

-विनय त्रिलोकेकर

(मागील अंकावरून पुढे चालू)

''काय झाले, डॅडी?'' दिनकरने घाबरत विचारले.

''काय झाले म्हणून मलाच विचार! तूच सांग. त्यांच्या अंगावर पाणी कशाला उडवलेस?''

आई किंवा वडिलांकडून, दिनकरला नीटसे आठवत नाही, कदाचित दोघांकडून असेल; पण बेदम मार तर मिळालाच होता, पण केवळ तेवढ्यावर निभावले नव्हते. काही वेळाने डॉक्टरांनी दिनकरला आपल्या स्टडी रूममध्ये बोलाविले.

''आज तुला जेवण नाही. येथेच थांब आणि ह्या खोलीतच झोप. तुला हीच शिक्षा,'' असे बोलून त्यांनी दिनकरला एकट्याला खोलीत ठेवले आणि खोलीचे दार बाहेरून बंद केले.

दिनकर रडरड रडला. सुरुवातीला अगदी ढसाढसा! मग हुंदके देत. त्याला झोप कधी लागली ते समजले नाही. झोपेतदेखील त्याचे स्फुंदणे चालूच होते. किती काळ झोपला? देव जाणो! त्याला जाग आली. त्याचे रडणे आता थांबले. एव्हाना त्याचे डोळे कोरडे झाले होते. तरीही त्याने आपले डोळे चोळले. खोलीतले दिवे 'ऑन' होते. दिनकरला खात्री होती. थोड्या वेळात नेहमीप्रमाणे मम्मी-डॅडी येणार. त्याला मिठीत घेऊन कुरवाळणार, समजवणार. जेवणही मिळणार. त्याला उपाशी पोटी कधीच ठेवले नव्हते. मग ह्या वेळेस तरी कसे ठेवतील? रात्रभर त्याला एकांतात नक्कीच ठेवणार नाहीत.हे सारे विचार त्याच्या मनात घोळत होते. अरे, अजून ते दोघे आले कसे नाहीत? अजून जेवण्यास अवकाश होता.

आणि ते पुन्हा घडले. कपाटावरील बाहुले बोलू लागले, ''हे बघ माझ्या मुला, तू आई-बाबांना असा त्रास का देतोस? मी आजपर्यंत तुला किती वेळा समजावले असेन. पण माझ्या बोलण्याकडे तुझे लक्ष असते कोठे? तू रडण्यात गर्क असतोस. गेल्या खेपेस तुझ्याएवढे तरी ध्यानी आले की मी तुझ्याशी बोलतो. तुला ह्या घरात मुद्दाम आणले आहे. नाहीतर तुझे काय झाले असते? येथे आणण्यामागे देवाची इच्छा असावी! हे सारे तुझ्याच हितासाठी आहे. हे सारे तुला धुळीस मिळवायचे आहे काय? नेहमी तू तुझ्या वडिलांना 'वेडेचाळे न करण्याचे' वचन देतोस. आता मला 'प्रॉमिस' दे. बोल, 'मी ह्या पुढे असे वाईट वागणार नाही'. कर पुढे तुझा हात आणि घे शपथ.''

'मुद्दाम आणले' ह्या शब्दाचा उलगडा दिनकरला त्यावेळेस समजला नव्हता आणि मलादेखील. दार उघडून मम्मी- डॅडी आत आले. दोघांचे डोळे पाणावले होते. दिनकरने त्यांना घट्ट मिठी मारली.

हा सारा किस्सा त्याने इतर कोणाला सांगितला की नाही, मला माहीत नाही. पण मला मात्र सांगितला.

'तुला ह्या घरात आणले आहे' ह्याचा अर्थ ज्याप्रमाणे मला (त्यावेळी) समजला नव्हता त्याप्रमाणे त्यालाही. पण आज तो जाणवतो. आम्ही दोघे एका 'पार्टीला' भेटलो. गप्पागोष्टी झाल्या. बोलताबोलता माझ्या 'ब्लॉग'चा विषय निघाला. कोणीतरी म्हणाले, ''तुझे 'Encounters with ghosts' आवडले.'' (माझे मराठीतून ब्लॉग लिहिणे अजून बाकी होते तेव्हा).

दिनकर म्हणाला, ''विनय, तू ब्लॉग लिहितोस? वाचायला हवेत. मी लहानपणी सांगितलेली गोष्ट आठवते? ब्राम्हणाच्या धडाची- बोलणाऱ्या बाहुल्याची! मग त्या बद्दल लिही की रे.'' तो अक्षरशः कळकळीची विनंती करीत होता. (He almost pleaded.)

''जरूर लिहीन,'' मी सांगितले, ''पण तुझे खरे नाव काही मी लिहिणार नाही. Your identity will not be disclosed. But I would like to clarify certain points with you and go through the whole story once again with you."

वाचकांना एक नम्र विनंती आहे की दिनकराचे खरे व्यक्तित्व जाणण्याचा प्रयत्न कृपया करू नये. .

आणि त्याने मला लहानपणी सांगितलेली गोष्ट पुन्हा एकदा ऐकवली. आता मात्र तो इंग्रजीत सांगत होता. ``----The whole meaning only dawned upon me much later in life – what that brahamin - statue meant by saying 'I was brought in this home' – I came to know that I was an adopted child – may be, when I was, say in V or VI class. It was my class mate Mandar, you know him, I suppose, who teased me about it. Making fun of me and jeering at me. तुला विकत घेतलाय. डॉक्टर अंकल तुझे खरे बाबा नाहीत.'Vinay, everything, what I told you then, did actually happen. विनय, तुला आठवत असेल, मी किती लहान होतो तेव्हा. How could such a small kid ever spin a yarn like that and that too a kid like me? आणि मी तर स्मार्ट किड पण नव्हतो! ''

तो ही गोष्ट सांगत असताना पार्टीतील आमचा इतर मित्रपरिवार ऐकत होता खरे; पण त्याच्यावर विश्वास ठेवत होते का? काहीना असेही वाटले असावे की नशेत तर काही बरळत नाही? कोणी असे बोललेदेखील, "He's drunk, yaar. What's Dinkar talking about? God knows!" पण तो नशेत बोलत नव्हता. कोणाचा विश्वास असो वा नसो. परंतु माझा संपूर्ण विश्वास, अगदी जेव्हा त्याने पहिल्यांदा सांगितला तेव्हाही, नंतर जेव्हा जेव्हा हा किस्सा सांगितला आणि ह्यावेळेसदेखील- खरोखर त्याच्या बाबतीत असे निश्चित घडले असणार. इतरांचा विश्वास बसो वा न बसो. म्हणूनच दिनकरच्या आग्रहास्तव मी लिहीत आहे.

तुम्हाला काय वाटते? हा एका लहान मुलाचा भ्रम होता? तो 'ब्राम्हण' डॉक्टरांच्या कुटुंबाचा रक्षणकर्ता आणि नंतर तो ब्राम्हणरुपी बाहुला दिनकरचा पाठीराखा तर नसेल? आणि आता तो कोठे आहे? तेवढे मात्र त्याला विचारायचे राहून गेले.

*

(पान २ कॉलम ३ वरून)

कलाकृती

प्रथम क्रमांक - सौ. मिनल हेमंत जयकर

द्वितीय क्रमांक - श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर

तृतीय क्रमांक - सौ. विद्या विजय त्रिलोकेकर

५) रांगोळी स्पर्धा - १५ वर्षांवरील महिलांसाठी

विषय - वैकुंठ चतुर्दशीची रांगोळी

प्रथम क्रमांक - सौ. विद्या विजय त्रिलोकेकर

द्वितीय क्रमांक - श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर

६) चित्रकला स्पर्धा

अ गट - ५ ते ८ वर्षे

विषय - आयत्या वेळी दिलेले चित्र क्रेयॉन कलरने रंगविणे. या गटात कु. कायशा सत्यजित नायक ही एकच स्पर्धक असल्यामुळे तिला समाजाचे बक्षिस देण्यात आले.

ब गट-९ ते १५ वर्षे-विषय- रंगपंचमी

प्रथम क्रमांक - कु. प्रणाली राकेश राणे

द्वितीय क्रमांक - कु. मोहना मनिष राणे

*

## पत्र प्रतिक्रिया

प्रत्येकाच्या आयुष्यातील चिमण्या आठवणी, गोड क्षण आणि निसर्गाचे चक्र, त्यातील मनाचे अंतरंग, भारवलेपण, नातीगोती या सर्वांचा धांडोळा 'परत फिरा'या लेखातून मनाला भावला. 'जागतिक चिमणीदिन' या निमित्ताने लहानग्या जीवापासून ते लोकमान्य टिळकांच्या अंगाखांद्यावर तुरुंगात गीतारहस्य लिहिताना त्यांच्याशी चिमण्या बिनधास्त खेळायच्या. अशा अनेक चिमण्यांच्या गोष्टी वाचकांच्या मनात जागवून गेल्या. जग बदललं तरी चिऊकाऊच्या गोष्टी प्रत्येकाच्या लहानपणात, तसेच मोठ्या झालेल्या आईबाबांच्या मनात आपली चिऊताई सतत शोधत असतात, त्यांची वाट पहात असतात. या सर्वांचा आपल्या दैनंदिन आयुष्यावर सतत ताण असतो. आपल्या लेखाने हलकेफुलके क्षण आम्हाला अनुभवायला मिळाले, याबद्दल अभिनंदन.

**-सौ. वैशाली सुनील आगासकर**

(पान ३ कॉलम ४ वरून)

करूच शकत नाहीत. माझा अभिजित ह्या भिशी पार्टीनं पोळला गेला. त्याला बरबाद करण्यात ह्या पार्टीनं काही कसर बाकी ठेवली नव्हती.''

''हे बघ अंजली, जे घडलं त्याला अभिजीत जबाबदार आहेच नं?''

''चुका कुणाच्या होत नाहीत मंजिरी? पण ह्या चुकांना सुधारण्याची संधी त्या मुलांना किंवा मुलींना चुचकारून दिली नाही तर त्या चुका मुलांना विपरीत परिणाम भोगायला लावतात. आपल्यासारख्या बायकांना वेळ घालवण्याचं साधन म्हणजे पैशांचे खेळ, सततची खरेदी नी रमीसारखे उद्योग. मध्यमवर्गीय बायका त्यांच्या मुलांना आत्मनिर्भर करतात, स्वतःच्या पायांवर उभं करून देतात. आपण आपल्या मुलांची पावलं पैशांच्या, सुखसोयींच्या बेड्यांमध्ये अडकवतो, त्यांना परावलंबी, बेजबाबदार करतो....''

मंजिरी मनोमन खूपच घाबरली. सुरेखा म्हणतेय त्याप्रमाणे आज माझा मंदार बिझनेसमध्ये आहे. पण हे आहेत तोपर्यंत त्याचं कर्तृत्व किंवा नाकर्तेपणा दोन्ही कळणार नाहीत. हे त्याला बिझनेसमध्ये कितपत तयार करू शकतील कोण जाणे. पण मी मात्र त्याला यशाचा मार्गसुद्धा दाखवू शकले नाही. आयुष्याच्या रस्त्यातले खाचखळगे दाखवणं तर दूरच; मग ते टाळून किंवा ओलांडून पुढे कसं जायचं ह्याचं बाळकडू पाजण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. मानसीलासुद्धा ती कोणत्या मार्गावर चालतेय ते कळणारच नाही. चिन्मय लेले, मेघना काळे, अभिजीत मोघेऐवजी उद्या मंदार किंवा मानसी असतील. भिशी पार्टी वाईट नाही. आहे ते श्रीमंत बायकांच्या भिशी पार्ट्यांचं रूप, त्यांचं कर्तृत्व (?) दुसऱ्या प्रकारच्या भिशी पार्ट्या चांगल्या ठरतात त्या त्यांच्या चांगल्या रूपामुळे, त्यात चाललेल्या चांगल्या कार्यामुळे.

खरी स्पर्धा, तुलना चर्चा तर ह्या भिशी पार्ट्यांची करायला हवी. मोठ्या प्रमाणावर ना सही, आपापसात का होईना - चांगल्या विचारांची देवघेव, चांगल्या तत्त्वांची ओळख नी जमेल तेवढ्या चांगल्या चांगुलपणाची जपणूक करायला हवी.

हां... ही स्पर्धा तर आपण करूच शकतो...

आणि ही भिशी पार्टी खूप उंचावर नेऊन ठेवू शकतो...

ह्या विचारांनी मंजिरी भारली गेली.....खुळावली... आणि भिशी पार्टीला नवं परिमाण देण्याच्या कल्पनेनं कामाला लागली.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर, कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर


## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

शॉना निषाद धुरंधर, विलेपार्ले

### कुर्यात् बटोर्मंगलम्

२७-४-१८ कु. अर्जुन अनिकेत नितीन तळपदे

### नांदा सौख्यभरे

२९-४-१८ श्री. चैतन्य विनोद मानकर कु. शकुंतला दत्ताराम पर्वते (आं. ज्ञा.)
४-५-१८ श्री. प्रनोज मनोज नवलकर कु. कृतिका सुधांशु व्यवहारकर

### विवाह षठ्यब्दीपूर्ती

२२-४-१९५८ (पूर्वाश्रमीच्या कु. सुनंदा आनंदराव धुरंधर)
२२-४-२०१८ श्री. मोतीलाल कन्हैयालाल कीर्तिकर सौ. सुनंदा मोतीलाल कीर्तिकर

### विवाह सुवर्णमहोत्सव

१०-५-१९६८ (पूर्वाश्रमीच्या कु. आशा दीनानाथ कीर्तिकर)
१०-५-२०१८ श्री. योगेशचंद्र दत्तात्रय आगासकर सौ. सुनीता योगेशचंद्र आगासकर

### मरण

१७-४-१८ श्रीम. सुवर्णा (मंगला) मूर्ती धैर्यवान, वय ८१, खार

## प्रभुतरुणास देणगी

* श्री. अजय मोतीलाल कीर्तिकर (लंडन) यांजकडून त्यांच्या आईवडिलांच्या (सौ. सुनंदा आणि कन्हैयालाल कीर्तिकर) विवाह षष्ठ्यब्दी सोहळ्याप्रीत्यर्थ रु. २५००/-
* सौ. रश्मी आणि श्री. नितीन वसंतराव तळपदे यांचा नातू आणि सौ. अदिती आणि डॉ. अनिकेत नितीन तळपदे यांचा सुपुत्र कु. अर्जुन याच्या २७-४-१८ रोजी झालेल्या व्रतबंधनाप्रीत्यर्थ रु. १००१/-
* कै. रमेश गजानन जयकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त श्रीमती मीना रमेश जयकर आणि परिवाराकडून रु. ५०१/-
* श्रीम. मंगला विलास अजिंक्य यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

देणगीदारांचे आभार

## आभार

* 'प्रभू प्रभात'च्या अध्यक्षा वृंदा शाम जयकर आणि संपादिका वंदना प्रमोद नवलकर यांनी 'प्रभुतरुणांच्या संपादिका प्रा. सुहासिनी अशोक कीर्तिकर यांना १६ एप्रिल २०१८ रोजी झालेल्या त्यांचा वाढदिवसा-प्रीत्यर्थ शुभेच्छापत्र पाठविले.

मन:पूर्वक आभार

* **प्रभुप्रभात वर्धापनदिन** - दि. १ मे २०१८ रोजी प्रभू प्रभात वर्धापन दिन श्री. अंबर कोठारे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. याप्रसंगी विविध पुरस्कार दिले गेले.

वर्धापन दिनानिमित्त 'वेलकम जिंदगी' हा गाजलेला नाट्यप्रयोग झाला. सौ. नीता सेंजित यांनी नेटके सूत्रसंचालन करून पारितोषिक वितरण समारंभात जान भरली.

## अभिनंदन

* डॉ.तन्मय प्रदीप विजयकर यांचा जयपूरला भरलेल्या होमियोपॅथी चर्चासत्रात सहभाग होता. त्यांच्या भाषणाला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

*

(पान ५ कॉलम ४ वरून)

१ जानेवारी १८६३ रोजी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी गुलामांच्या मुक्ततेची घोषणा करून ४० लक्ष निग्रो गुलामांना गुलामगिरीतून मुक्त केले. १८६५ मध्ये अमेरिकेत गुलामगिरी संपूर्णपणे नष्ट झाली. त्याचवेळी इंग्लंडमध्येही हा व्यापार बंद झाला पाहिजे असा जनतेचा निर्धार झाला. हा प्रश्न पक्षीय न मानता राष्ट्रीय मानण्यात आला व ब्रिटिश संसदेने प्रजेला व ब्रिटिश जहाजांना ह्या व्यापारात भाग घेण्यास बंदी केली. इंग्रजांच्या जहाजांची मोठी संख्या आणि आरमाराचे समुद्रावरील वर्चस्व; या दोन गोष्टींमुळे अर्ध्याहून अधिक व्यापार इंग्रजांच्याच हाती होता. ह्या व्यापाराचा संपूर्ण बिमोड करण्यासाठी ब्रिटनला अमेरिकेचे मोलाचे सहाय्य मिळाले. ह्या कालखंडात समुद्रावर गस्त घालून, पहारा ठेवून, निरनिराळ्या राष्ट्रांवर दडपण आणून; वेळप्रसंगी आपल्या आरमारी शक्तीचा उपयोग करून ब्रिटन व अमेरिकेने गुलामांचा हा व्यापार बंद पाडला.

अटलांटिक महासागरातून होणारा व्यापार जरी बंद झाला तरी आफ्रिका खंडातील व्यापार बंद होण्यास बराच कालावधी लागला. आफ्रिकेतून गुलामांची विक्री तुर्कस्तान, इराण व अरबस्तान येथे सुरूच होती. ह्या व्यापाराचे मुख्य केंद्र झांझीबार येथे होते. शेवटी झांझीबारने १८७३ मध्ये आपल्या बंदरातून चालणाऱ्या ह्या व्यापारावर बंदी घातल्यामुळे आफ्रिका व आशिया खंडातील गुलामांच्या व्यापारास प्रतिबंध झाला. गुलामगिरीची प्रथा मोडण्यात व गुलामांचा व्यापार बंद करण्यासाठी ब्रिटनने नेतृत्व केले असले तरी ब्रिटनला त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक प्रयत्न करावे लागले. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध करार करून गुलामांचा व्यापार नष्ट करण्याच्या तत्त्वास इतर राष्ट्रांची संमती मिळवली. ह्या करारांमुळे आंतरराष्ट्रीय सहकार्याची हमी मिळाली व जहाजांची तपासणी करण्याची व्यवस्था होऊ शकली व गुलामांचा चोरटा व्यापार ब्रिटनला आपल्या आरमाराच्या जोरावर बंद करता आला. युरोपात सुधारकांनी या अमानुष व्यापाराला विरोध करायला सुरुवात केल्यामुळे हा व्यापार बंद पडला. पण त्याचबरोबर, त्याच सुमारास युरोपात झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे शेती यंत्रांच्या सहाय्याने होऊ लागली. मोठमोठे मळे पिकविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर माणसांची गरज राहिली नाही. त्यामुळे गुलामांची मागणीदेखील हळूहळू कमी होत गेली.

हिंदुस्थानात एवढ्या मोठ्या प्रमाणावर गुलामांचा व्यापार होत नव्हता हे खरे. पण गुलामगिरीची पद्धत इंग्रजांची सत्ता स्थिर होईपर्यंत सुरू होती हेही तितकेच खरे. ती बंद करण्याचे काम इंग्रजांनी हळूहळू केले. १८११ मध्ये परदेशातून आणलेले गुलाम येथे विकण्यास मनाई करण्यात आली. तर १८४३ मध्ये कोणत्याही पद्धतीची गुलाम पद्धती बेकायदेशीर ठरवून, गुलामांच्या मालकांना कोठल्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता गुलामांची मुक्तता करण्यात आली. १८६० पासून इंडियन पिनल कोड मध्ये कोणत्याही इसमाला गुलाम म्हणून विकणे किंवा खरेदी करणे गुन्हा ठरवून त्याला शिक्षा सांगितली आहे.

*

## पत्र प्रतिक्रिया

संपादक, प्रभू तरुण

एप्रिलचा 'प्रभू तरुण'चा अंक आवडला.विश्वास अजिंक्य यांचा 'गोल्ड रश' वाचनीय होता. विनय त्रिलोकेकर यांच्या 'पाठीराखा' या कथेने उत्कंठा वाढवली आहे.आणि आपले संपादकीय 'परत फिरा' याबद्दल काय बोलावं. मनात एकच विचार आला असं 'ललित' लिहायला आपल्याला जमायला हवं.

धन्यवाद

आपला,

**नंदकुमार कृ विजयकर**

*

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67